# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/१०/२०१६

१) पिकअप गाडीच्या चालकांच्या लापरवाहीने ,एक जखमी . :–

दिनांक २२/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी राष्ट्रपाल प्रल्हाद पोहळे वय २४ वर्ष, रा. कान्द्री /जाम मा. मोहाडी हा आपली गाडी क्र. एमएच ३६ एच ३०७७ ने भंडारा कडुन नागपुर कडे जात असतांना एनएच ०६ रोड कवळसी फाटया जवळ विरुध्द दिशेने येणा–या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील पिकअप गाडी हयगयीने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे गाडीला धडक देवुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

२) आमरोडवर लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २२/१०/२०१६ रोजी १४.०० ते १४.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मारोती ओमनी गाडी क्र. एमएच ३१ व्ही १३२३ चा चालकाने सार्वजनिक ठिकानी आमरोडवर येना–या जाना–या लोकांच्या जिवितास धोका व वाहतुकीस अळथळा होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

३) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–

दिनांक २२/१०/०१६ रोजी १८.०० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० के. ७५८९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत तहसील फाटा पवनी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४)जागेच्या वादावरुन मौका चौकशी सुरु असतांना अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली. :–

दिनांक २२/१०/२०१६ रोजी १६.१५ वा. दर. यातील फिर्यादी शिवचरण मार्कड बडवाईक वय ५३ वर्ष, रा. सावरबंध हा महात्मा गांधी तंटामुक्त समीतीचा अध्यक्ष असुन तंटामुक्ती समिती मध्ये हरि गवतु ऊके या गावक–यानी यातील आरोपी विरुध्द तंटामुक्ती समितीला जागेच्या वादावरुन अर्ज दिला होता त्याची मौका चौकशी करीता तंटामुक्ती अध्यक्ष व पदाधिकारी व पोलीस पाटील, अर्जदार असे गेले असता दोन आरोपीतांनी सार्वजनीक ठिकाणी संगनमत करुन फिर्यादीस व ईतर पदाधिकारी यांना अश्लिल शब्दात शिविगाळ करुन तुम्ही काय न्याय करुन शकता जास्त केल्यास तुमचा नायनाट करुन टाकीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २२/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०० प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तसेच तिन सिटर वाहनांवरती १७ केसेस व ईतर वाहनांवरती ८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता